**प्रतिवादीतर्फे साक्षीदार कमांक १ चा पुढील सरतपास .**
**प्रतिवादीतर्फे वकिल श्री प्रसाद यांचेमार्फत**

१		मी सदर प्रकरणात माझे शपथपत्र दाखल केलेले असून त्यातील मजकूर माझया सांगण्याप्रामणे खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. तो मजकूर मी स्वत: वाचलेला आहे. मी दावा शेत विकत घेतले त्याचा गट dz-204@1 आहे. सदर दावा शेत हे मौजा अंबाडी येथे आहे. दावा शेताचे मुळ विकीपत्र हे याच न्यायालयातील दावा dz-25@2003 यामध्ये दाखल केलेले आहे. मी विकीपत्राची दाव्या दाखल असलेल्या न्यायालयाची सत्यप्रत प्रस्तुत दाव्यात दाखल केली आहे. आता मला ती प्रत दाखवली व ती खरी व बरोबर आहे. (दाव्यात दाखल सत्यप्रत ही अगोदरच याच न्यायालयासमोर मुळ प्रत दाखल आहे. या अगोदर न्यायालयाने विकीपत्राची सत्यप्रत दुयम पुरावा म्हणुन सादर करण्याची परवानगी नि.११४ या वरील आदेशानुसार दिली आहे. सबब, वादीचे वकिल यांनी निशाणी देण्यास हरकत घेतली परंतु वादीनेच दाखल केलेल्या त्यांच्या दाव्यात सदर विकीपत्र नि.८१ प्रमाणे सिध्द झाले आहे. तसेच विकीपत्र हे जरी खाजगी दस्त असले तरी ते सरकारी कार्यालयातून सक्षम अधिकारी यांनी प्राधीकृत केले आहे. त्यामुळे सार्वजनीक दस्त या व्याख्येनुसार त्यास निशाणी देता आहे. सबब, त्यास **नि.१२२** देण्यात येत आहे.) सदरचे विकीपत्र हे वासुदेव श्रावण गोरले याचेकडुन विकत घेतले आहे. विकीपत्रात विकी करणार म्हणुन वासुदेव याचा अंगठा आहे तसेच माझी खरेदी करणार म्हणुन माझी सही आहे. समंती देणार म्हणुन वासुदेवच्या मुलाने समती दिली व साक्षीदार म्हणुन अरूण गोरले व भागवत भाकरे यांच्या सहया आहे. सदरचे विकीपत्र १२.३.२००३ रोजी झाले होते. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. मी पुराव्याकामी दावा

शेताचे सात बारा उतारे अनुक्रमे **नि.१२३ ते १२८** वर दाखल केलेले आहे. दावा शेताचा ८-अ उतारा दाखल केलेला आहे. त्यास **नि.१२९** देण्यात येत आहे. दावा शेताचे दोन पटवारी नकाशे दाखल केले आहेत. त्यांना अनुक्रमे **नि.१३० व १३१** देण्यात येत आहे.

**उलटतपास वादीतर्फे वकील श्री गायकवाड**

मध्यांन्हा सुटीमुळे उलटतपास तहकुब.

श्रवणोत्तर स्विकृत

( प्रशांत कुलकर्णी )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
कुही.

दिनांक १०/०१/२०१७

**मध्यांन्हानंतर उलटतपास वादीतर्फे वकील श्री गायकवाड**

२. हे म्हणने खरे आहे की, वासुदेव याने विक्रीपत्र करून दिले त्या दिवशी त्याची पत्नी भुलाबाई ही जिवंत होती. हे म्हणने खरे आहे की, वासुदेव याला कचरू व ऋषीदेव हे दोन मुले तसेच यशोदा वानखेडे बिंदाबाई वानखेडे या दोन मुली आहेत. हे म्हणने खरे आहे की, गट क्र. ५६ तसेच गट क्र.२०४/१ व कामठी शिवारातील ६ एकर शेत हे श्रावणचे मृत्यूनंतर वासुदेवच्या ताब्यात आले. वरील तीनही शेत श्रावणचे मृत्यूनंतर वासुदेव याच्या हिश्यावर आली. वरील तीनही शेत वासुदेव जिवंत असेपर्यंत महसुल दप्तरी वासुदेव याचे नावे होते. हे म्हणने खरे आहे की, वासुदेव याने सन २००३ साली विक्रीपत्र करून दिले त्यावेळी वासुदेव हे मुलगा ऋषीदेव याच्याकडे राहण्यास होता. भुलाबाई ही कचरू याच्याकडे राहत होती याबाबत मला माहीत नाही. हे म्हणने खरे आहे की, कचरू व ऋषीदेव हे वेगवेगळे राहत होते. वासुदेव याने त्याचे

तीनही शेताच्या तोंडी हिस्सेवाटी आपले मुलात व मुलींमध्ये केले, सदर हिस्सेवाट कोणत्या वर्षी व तारखेला झाली याबाबत मी कथन केलेले नाही. वासुदेव याने वरील तीनही शेतापैकी आपले मुलींना कोणत्या शेताबाबत हिस्सा दिला याबाबत मला माहीत नाही. वासुदेव याने वरील तीनही शेतापैकी त्याचे मुलांना कोणत्या शेतात हिस्सा दिला याबाबत मला माहीती नाही. मी गट क्र.५६ व कामठी शिवारातील ६ एकर जागेचा महसुली अभिलेख हा मी दाव्यातील शेत खरेदीकरण्यापुर्वी पाहीले होते. सदर अभिलेख हा वासदेव याच्या नावे होता. शेत गट क्र.५६ व कामठी शिवारातील ६ एकर जागा तसेच दाव्यातील गट क्र.२०४/१ या तीनही शेताचा रेकॉर्ड मी दाव्यातील शेत विकत घेतले त्यावेळी वासुदेव याचे नावाने होता.

३.     वासुदेव हे वयोवृध्द असल्यामुळे त्यांना वाताचा आजार होता. मला त्यांचे कोणत्या डॉक्टरचा उपचाराबाबत माहीती नाही. मी वासुदेव यांचे आजाराचा औषधाचे कागदपत्र दाखल केले नाही. वासुदेव याने विक्रीपत्रात तो वयोवृध्द झाल्यामुळे व त्याला आजाराकरीता औषध पाण्याकरीता पैश्याची आवश्यकता आहे असे नमुद आहे. विक्रीपत्रामध्ये नमुद आहे की, वडिलोपार्जीत शेती माझे हिश्यावर आली व ती मी तुम्हाला विकत आहे. आता मला विक्रीपत्र नि.१२२ दाखविले त्यामध्ये वासुदेव याने वडिलोपार्जीत शेती हिश्यावर आली व ती तुम्हाला विकत आहे असे नमुद नाही. आता माल नि.१२२ विक्रीपत्र दाखविले त्यामध्ये वासुदेव याने आजारपणासाठी औषध पाण्याकरीता पैश्याची गरज असल्यामुळे शेत विक्री करतो असे नमुद केले नाही. नि.१२२ पाहता, विक्री करणार म्हणुन वासुदेव याचा अंगठा व समती देणार म्हणून ऋृषीदेव याची संमती घेण्यात आली. हे म्हणने खरे नाही की,

ऋषीदेव याच्याशी माझे चांगले संबंध आहे. हे म्हणने खरे आहे की, विक्रीपत्राच्या दिवशी मी नागपूरहून कुही येथे आलो होतो व तसेच वासुदेव, ऋषीदेव व साक्षीदार हे अंबाडी येथून कुही येथे आले होते. सदर दिवशी अर्जनविस कांबळे यांना भेटलो. अर्जनविस याला विक्रीपत्राची माहीती मी दिली होती. त्यावरून अर्जनविसाने त्याप्रमाणे विक्रीपत्र तयार केले. विक्रीपत्राच्या दिवशी वासुदेव यांना मी ७०,०००/- ते ७५,०००/-रूपये दिले असतील. विक्रीपत्राच्या दिवशी ७०,०००/-ते ७५,०००/-रूपये दिले असे विक्रीपत्रात नमुद नाही. साक्षीदार सांगतो की, मी त्यांना एकुण ८५,०००/- दिले होते. विक्रीपत्र झाल्यानंतर मी नागपूर येथे निघुन गेलो तसेच वासुदेव व ईतर अंबाडी येथे निघुन गेले. हे म्हणने खरे आहे की, मी पुराव्या प्रतिज्ञापत्रात सांगीतले आहे की, विक्रीपत्राच्या दिवशी मला दावा शेताचा ताबा दिला. हे म्हणने खरे नाही की, विक्रीपत्राच्या दिवशी दावा शेताचा ताबा देण्यात आला नाही किंवा ताबा दिल्याचे विक्रीपत्रात नमुद देखील केले नाही. हे म्हणने खरे आहे की, मी माझया पुरावा प्रतिज्ञापत्रात परिच्छेद क्र.३ मध्ये सांगीतले की, विक्रीपत्राच्या दिवशी दावा जागेचा ताबा देण्यात आला, परंतु मुळ विक्रीपत्रात असे नमुद आहे की, यापुर्वीच जागेचा मला ताबा देण्यात आला. हे म्हणने खरे नाही की, वासुदेव याने विक्रीपत्राच्या पुर्वीच तसेच विक्रीपत्राच्या दिवशी असा कोणताही दावा शेताचा कब्जा मला दिला नव्हता.

४. हे म्हणने खरे आहे की, वासुदेव मरण पावल्यानंतर ४-५ वर्षोने पत्नी भुलाबाई मरण पावली. हे म्हणने खरे आहे की, दि.१२.३.२००३ रोजीच्या विक्रीपत्रानुसार दावा शेती याचेवर मी माझे नावे फेरफार केला. हे म्हणने खरे आहे की, वादी कचरू याने प्रस्तुत दावा हा वासुदेव जिवंत असतांना दाखल केला होता. हे म्हणने खरे आहे की, मी त्यानंतर

कचरू व त्याचे आईविरूध्द मनाई हुकुमाचा दावा शेताबाबत दाखल केला. हे म्हणने खरे आहे की, मी दाखल केलेल्या दाव्यामध्ये तात्पुरर्ता मनाई हुकुम याचा आदेश माझे पक्षात झाला आहे. हे म्हणने खरे नाही की, मला मिळालेल्या तात्पुरर्त्या मनाई हुकुमाचा आधार घेउन दि.११.१.२००९ रोजी दुपारी ३ वाजता दावा शेताचा कब्जा कचरू याच्याकडुन घेतला.

५. हे म्हणने खरे नाही की, वासुदेव याने त्याच्या तीन्ही वडिलोपार्जीत शेताच्या मुली, मुलांमध्ये व स्वत:मध्ये तोंडी वाटण्या करून दिल्या नव्हत्या. हे म्हणने खरे नाही की, दावा शेत हे वाटणीमध्ये वासुदेव याच्या हिश्यावर कधीच आला नव्हता. हे म्हणने खरे नाही की, दावा शेतात मयत वासुदेव व त्याची पत्नी, दोन मुले तसेच दोन मुली या सर्वांचा अविभक्त हिस्सा होता व आहे. हे म्हणने खरे आहे की, दि.१२.३. २००३ रोजीचे विक्रीपत्रानुसार दावा शेताचा मी तलाठी यांचेकडून फेरफार केला. हे म्हणने खरे नाही की, वासुदेव याला दावा शेती विक्रीपत्राद्वारे विक्री करण्यासाठी पैश्याची कोणतीही आवश्यकता नव्हती. हे म्हणने खरे नाही की, वादी तसेच त्याच्या आई व बहीनीला यांचा दावा शेतातील हिस्सा डावलण्यासाठी खोटे विक्रीपत्र वासुदेव व ऋषीदेव यांचेकडून माझे नावे करून घेतले. हे म्हणने खरे नाही की, दावा शेताचे झालेले विक्रीपत्र हे वादी, त्याची आई व बहीनी यांचेवर बधंनकारक नाही. हे म्हणने खरे नाही की, दावा शेतामध्ये वादी कचरू व त्याची बहीनी यांचा हिस्सा आहे. हे म्हणने खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

फेरतपास - नाही
वा.दा.ब.आहे.

श्रवणोत्तर स्विकृत

दिनांक १०/०१/२०१७

( प्रशांत कुलकर्णी )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कुही.